# प्रेस नोट दिनांक २८/०४/२०१९

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## सूता वरून गाठला स्वर्ग

दि. २०/०४/२०१९ रोजी महिला नामे सौ. जया धिवरे वय ३५ रा. शिवणे, पुणे यांनी त्यांचा मुलगा वय १५ वर्ष रा. सदर हा सकाळी ०७/३० वा. त्याचे श्रीमती रत्ना प्रभादेवी मोहीते पाटील शाळा कोथरूड पुणे येथे जाणे करीता घरातून निघाला परंतु तो शाळेत न पोहचता त्यास कोणी तरी अज्ञात इसमाने पळवून नेलेबाबत तक्रार दिल्याने सदर बाबत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं १७०/१९ भा.द.वि.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर मुलाकडे मोबाईल फोन होता परंतु तो बंद असल्याचे निष्पन्न झाले. बंद मोबाईल वरून मुलगा मुंबई मध्ये असल्याचे निष्पन्न झाले होते. परंतु एवढया माहिती वरून मुंबई सारख्या महा मायावी दुनियेत जाऊन चिमुकल्याचा शोध घेण्याचे काम पोलीसांना करावयाचे होते. सदरचे काम म्हणजे **गवतातुन सुई शोधणे** सारखे होते.

परंतु वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने हार न मानता गुन्हे प्रकटीकरण पथकातील कर्मचारी पोलीस नाईक चंद्रकांत जाधव यांनी मिळवलेल्या माहितीचे आधारे पोलीस नाईक धनंजय ताजणे व पोलीस नाईक अमोल काटकर यांनी कोणतीही तांत्रीक माहीती उपलब्ध नसताना मुंबई येथे जाऊन केवळ बातमीदारांचे मार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे आग्रीपाडा, भायखळा, डोंगरी व मश्जिद बंदर मुंबई या ठिकाणी फिरून सदर मुलाचा फोटो लोंकाना दाखवुन, दिवस रात्र सदर मुलाचा कसोशिने शोध घेवुन, सदर मुलास शासन सम्राट श्री. नेमसुरजी नरेश मेहता स्ट्रीट, स्टेशन जवळ, मश्जिद बंदर, मुंबई येथुन सुखरूप ताब्यात घेऊन त्याचे आई वडीलांचे ताब्यात दिले. मुलाची व आई वडिलांची भेट झाल्यानंतर “ **सूता वरून स्वर्ग** ” गाठल्याचा आनंद पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना झाला.

सदर मुलाकडे केले तपासात केवळ मौजमजा करणे करता, तो घरात कोणास काही एक न सांगता मुंबईला गेला असल्याचे निष्पन्न झाले असून त्याचेकडे असलेला मोबाईल हा त्याचेकडे मिळून आलेला नाही. मोबाईल हरवला असल्याचे जरी त्याने सांगितले असले तरी मौजमजा करण्याकरीता लागणा-या पैश्याकरीता त्याने तो कोणास तरी विकला असावा.

सतत चार दिवस अखंड कष्ट घेऊन सूता वरून स्वर्ग गाठणारी कामगिरी वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मण उकिर्डे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस

निरीक्षक श्री. नितीन बोधे, पोलीस नाईक धनंजय ताजणे, पोलीस नाईक अमोल काटकर व पोलीस नाईक चंद्रकांत जाधव यांनी केली आहे.

